DAY — **12** SEAT NUMBER | | | | | | |

| 2025 | II | 27 | 1100 | **J-340** | (M) |
|---|---|---|---|---|---|

# HISTORY AND DEVELOPMENT OF INDIAN MUSIC (65)

**Time : 3 Hrs.** **(4 Pages)** **Max. Marks : 100**

*सूचना : (१) प्रश्नपत्रिकेतील सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.*

*(२) प्रश्नांच्या उजवीकडील अंक गुण दर्शवितात.*

*(३) वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिताना संपूर्ण विधानासह लिहिणे आवश्यक आहे.*

*(४) सर्व प्रश्नांची उत्तरे नवीन पानावर लिहावीत.*

**प्र. १. (अ)** योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा आणि संपूर्ण वाक्य लिहा **[१४]**

(कोणतेही सात) : (७)

(१) पंडित पलुस्कर यांचा जन्म -------- येथे झाला.

(कुरूंदवाड, मुंबई)

(२) गातांना किंवा वाजवतांना रागामध्ये ज्या स्वरावर आपण थांबतो त्या स्वरास -------- असे म्हणतात.

(कण स्वर, न्यास स्वर)

(३) बालगंधर्वांची अखेरची भूमिका 'एकच प्याला' नाटकातील -------- ची होती.

(सिंधू, यशोदा)

(४) रागाची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन विलंबित किंवा मध्य लयीत केलेला स्वरविस्तार म्हणजे ------- होय.

(तान, आलाप)

(५) 'सारे जहाँ से अच्छा' या गीताचे संगीत दिग्दर्शन ------ यांनी केले.

(पंडित रविशंकर, उस्ताद अब्दुल करीम खाँ)

(६) स्वरांचे कंपन करून त्यांना वजन देण्याच्या क्रियेला ------- असे म्हणतात.

(गमक, थाट)

(७) पंडिता मृणालिनी साराभाई यांचे प्रारंभिक शिक्षण ------- येथे झाले.

(स्वित्झर्लंड, जपान)

(८) धमार या तालाचा उपयोग ------ या गीतप्रकारासाठी होतो.

(ख्याल, धमार)

**(ब)** खालील 'अ' गटातील शब्द/शब्दसमूहांच्या 'ब' गटातील शब्दांसोबत योग्य जोड्या जुळवा (कोणतेही सात) : (७)

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) संगीत बालबोध | (१) शकुंतला |
| (ब) तान | (२) मृणालिनी साराभाई |
| (क) बालगंधर्व | (३) द्रुत लयीत स्वर विस्तार |
| (ड) अलंकार | (४) रागवाचक स्वर समूह |
| (इ) प्रसिद्ध नर्तिका | (५) पंडित पलुस्कर |
| (फ) पकड | (६) भजनी |
| (ग) भक्ती संगीत | (७) पुढच्या किंवा मागच्या स्वराला स्पर्श |
| (ह) कण स्वर | (८) स्वरांची क्रमिक रचना |

**प्र. २.** **(अ)** खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही सात) : (७) **[१४]**

(१) सभेच्या शेवटी 'वंदे मातरम्' म्हणण्याची प्रथा कोणी सुरू केली?

(२) 'थाट' या पारिभाषिक शब्दाची व्याख्या लिहा.

(३) 'अथ स्वागतम् शुभ स्वागतम्' या स्वागतगीताचे संगीत दिग्दर्शन कोणी केले?

(४) 'ठुमरी' या गीतप्रकारासाठी कोणता ताल घेतला जातो?

(५) 'जमजमा' ची व्याख्या लिहा.

(६) बालगंधर्वांचे संपूर्ण नाव लिहा.

(७) आलापामध्ये घेतलेली मध्यलयीतील छोटी तान म्हणजे काय?

(८) 'दर्पण ॲकॅमडी ऑफ परफॉर्मिंग आर्टस्' या संस्थेची स्थापना कोणी केली?

**(ब)** खालील विधाने 'बरोबर' की 'चूक' ते लिहा (कोणतेही सात) : (७)

(१) पाच स्वर असलेल्या रागाच्या जातीला ओडव जाती असे म्हणतात.

(२) पंडित वि.दि. पलुस्कर यांनी संगीत अमृतप्रवाह हे पुस्तक लिहिले.

(३) सरोद, सतार या वाद्यांवर वाजविल्या जाणाऱ्या तानांना झाला असे म्हणतात.

(४) पंडिता मृणालिनी साराभाई यांनी नृत्यनाटिकांच्या रचना केल्या.

(५) धुमाळी हा ताल बारा मात्रांचा आहे.

(६) तत प्रकारच्या वाद्यांवर विलंबित लयीमध्ये वाजविल्या जाणाऱ्या गतीला मसीतखानी गत असे म्हणतात.

(७) बालगंधर्वांनी गंधर्व नाटक मंडळी या संस्थेची स्थापना केली.

(८) रागनिर्मितीची क्षमता असलेल्या सात स्वरांच्या समूहाला मुर्च्छना असे म्हणतात.

**प्र. ३.** स्वातंत्र्यपूर्व किंवा स्वातंत्र्योत्तर काळखंडातील भारतीय संगीताचा इतिहास सविस्तर लिहा. **[१४]**

**प्र. ४.** स्वातंत्र्योत्तर काळातील 'महाराष्ट्रातील नाट्यसंगीताची स्थिती' याविषयी विस्तृत माहिती लिहा. **[१४]**

**प्र. ५. टिपा लिहा :** **[१४]**

(१) भरतनाट्यम् किंवा लावणी (७)

(२) सनई किंवा जलतरंग (७)

**प्र. ६.** भारतीय संगीत शिक्षणात प्राचीन गुरू-शिष्य परंपरेपासून आधुनिक संगीत शिक्षण पद्धतीपर्यंत कसे परिवर्तन झाले ते सविस्तर लिहा. **[१४]**

**प्र. ७. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **[१६]**

(अ) खालील कोणतेही दोन ताल लिपीबद्ध करा. : (८)

(१) चौताल

(२) खेमटा

(३) एकताल

(ब) खालील कोणत्याही एका गीतप्रकाराची माहिती लिहा : (८)

(१) ठुमरी

(२) गझल

◆◆◆